
● वर्ष : ०३ ● अंक : ०७५ ● पुणे ● गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

# २ हजार किलो नैवेद्य आणि जयघोषांचा गजर





# चंपाषष्ठीची भक्तिमय सांगता

## २ हजार किलो भरीताचा नैवेद्य आणि ५० हजार भाविकांना महाप्रसाद!

**जेजुरी (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्राच्या कुलदैवत खंडोबा देवाच्या चंपाषष्ठी उत्सवाची भव्य सांगता बुधवारी (दि. २६) जेजुरी गडावर मोठ्या भक्तिभावात पार पडली. तब्बल २ हजार किलो वांग्याचे भरीत, हजारो बाजरीच्या भाकऱ्या, पुरणपोळी व मिष्टान्न यांचा नैवेद्य दाखवून सहा दिवस चाललेल्या उत्सवाची सांगता करण्यात आली. या प्रसंगी तब्बल ५० हजारांहून अधिक भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

मार्गशीर्ष प्रतिपदेला करवीर पीठाचे शंकराचार्य श्री. नृसिंह भारती यांच्या हस्ते उत्सवमूर्तींची विधिवत घटस्थापना झाल्यापासून जेजुरी मल्हारमय झाली होती. पूजा-अभिषेक, देवदीपावली, तेलहंडा, देवतेचे तेलवण-हळद, वाघ्या–मुरळी यांची सेवा, भजन-कीर्तन, लोककलावंतांची प्रस्तुती आणि सनई-चौघड्यांच्या मंगलध्वनीने गड सहा दिवस दुमदुमला.

बुधवारी सकाळी महापूजेनंतर विश्वस्त व पुजारी यांच्या उपस्थितीत उत्सवमूर्तींवर दुग्धाभिषेक करण्यात आला.





त्यानंतर रंगमहालातून मुख्य मंदिरापर्यंत उत्सवमूर्तींची पारंपरिक मिरवणूक काढण्यात आली. वांग्याचे भरीत, बाजरीचे रोडगे व पुरणपोळीचा मोठा नैवेद्य दाखवून सहा दिवसांच्या उपासनांचा समारोप झाला.

"येळकोट जय मल्हार"च्या जयघोषाने गड दुमदुमला : पहाटेपासूनच दर्शनासाठी भक्तांची रांग सुरू झाली. "यळकोट यळकोट जय मल्हार"च्या गरजांनी परिसर दणाणून गेला. महाराष्ट्रासह राज्याबाहेरून आलेल्या भाविकांनीही मोठी उपस्थिती लावली.

### आख्यायिका आणि भक्तीपर अर्थ

मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी हा भगवान खंडोबाचा अवतारदिन. पुराणकथेनुसार पृथ्वीवर अत्याचार करणाऱ्या मणि आणि मल्ल या राक्षसांचा संहार करण्यासाठी भगवान शिवांनी मल्लारी रूप धारण केले. भीषण युद्धात मल्लाचा व नंतर मणीचा पराभव झाला. क्षमा मागणाऱ्या मण्याला भगवानांनी वाहनरूपात स्वीकारले. त्याच्या कुबडीतून निर्माण झालेल्या हळदीच्या भंडाऱ्याचेच रूप आजच्या पिवळ्या उधळण्यात दिसते. अन्यायाविरुद्ध उभे राहणे, दुर्बलांचे रक्षण करणे आणि धर्मरक्षणाची प्रेरणा घेणे.

### विश्वस्त व सेवेकऱ्यांची महत्वपूर्ण भूमिका

उत्सवाचे नियोजन सुरळीत पार पाडण्यासाठी विश्वस्तमंडळाने काटेकोर व्यवस्था केली होती. यात मंगेश घोणे, डॉ. राजेंद्र खेडेकर, ॲड. पांडुरंग थोरवे, पोपट खोमणे, विश्वास पानसे, अभिजित देवकाते, आशिष बाठे, बाळासाहेब खोमणे, गणेश आगलावे, प्रशांत सातभाई, अनिल आगलावे, सतीश कदम, युवराज लांघी, मल्हार बारभाई आणि सेवकवर्ग यांचा सहभाग उल्लेखनीय ठरला.

### भक्ती, रोषणाई आणि श्रध्देची सांगता

चंपाषष्ठी निमित्त सजवण्यात आलेली रोषणाई, गडावरील पिवळ्या भंडाऱ्याची उधळण आणि भाविकांची गर्दी यामुळे संपूर्ण परिसर भक्तिभावाने उजळून निघाला. जेजुरी गडावर भाविकांचा उत्साह, मंगलमय वातावरण आणि महाप्रसादाचा सोहळा पाहण्यासाठी सर्वत्र उत्साहाचे वातावरण होते.

### २ हजार किलो भरीताचा महाप्रसाद!

जय मल्हार चंपाषष्ठी अन्नछत्र प्रतिष्ठान आणि जेजुरी देवसंस्थान यांच्या वतीने महाप्रसादाचा भव्य उपक्रम आयोजित करण्यात आला. दोन हजार किलो भरीत, हजारो भाकरी आणि मिष्टान्नाचा प्रसाद उत्साहात वाटप करण्यात आला. भाविकांच्या अभूतपूर्व गर्दीमुळे परिसरात धार्मिक उत्साह ओसंडून वाहत होता.

**1,22,570**

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

पुण्यातील लोकप्रिय दैनिक












## ठळक बातम्या

### गाडीवर कोयता नाचवत दहशत

भोर (आरंभ पर्व) : पुण्याच्या भोर तालुक्यातील नसरापूर परिसरात दोन धारदार शस्त्रांच्या बळावर दहशत माजवणाऱ्या तरुणाला राजगड पोलीस ठाण्याच्या पथकाने जीवाची पर्वा न करता धाडस दाखवत ताब्यात घेतले. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. घटना बुधवारी दुपारी पुणे-सातारा महामार्गालगतच्या चेलाडी-नसरापूर रोडवर घडली. स्वप्निल विजय जाधव हा तरुण MH 04 JW 0847 या क्रमांकाच्या दुचाकीवर बेफाम वेगाने जात होता. रस्त्यावर शाळकरी मुले आणि नागरिकांची ये-जा सुरू असतानाच मोठा धोका निर्माण झाला होता. याचवेळी मल्हार गॅरेजचे मालक राहुल अंकुश खुटवड हे रस्त्यावर होते. त्यांनी स्वप्निलला हळू वाहन चालवण्याचा साधा सल्ला दिला. मात्र एवढ्याशा बोलण्याने संतापलेल्या स्वप्निलने अचानक कमरेस लावलेला कोयता आणि सतूर काढले. दोन्ही धारदार शस्त्रे हवेत फिरवत त्याने राहुल यांना जोरदार शिवीगाळ सुरू केली. त्यानंतर त्याने राहुल यांना धमकावले आणि मारहाणही केली.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा




# निवडणूक आयोग आणि भाजप

काहीवेळा एखादी छोटीशी कृतीही एखाद्याचा बुरखा टराटरा फाडून टाकते. निवडणूक आयोगाबाबत असेच घडले आहे. देशातील १२ राज्यांत आणि केंद्रशासित प्रदेशात मतदार याद्यांचे विशेष सखोल पुनरीक्षण करण्याचा आदेश आयोगाने जाहीर केला. येत्या एप्रिलमध्येच निवडणुका होणार असूनही आसामचा मात्र या यादीत समावेश नव्हता. त्यानंतर १७ नोव्हेंबरला आसामसाठीही अशा विशेष पुनरीक्षणाचा आदेश गुपचूप जारी केला गेला. मात्र, हा विचित्र आदेशच आयोग आणि भाजप यांच्यातील संगनमत उघड करतो.

मतदार यादीतून विदेशी नागरिक वगळणे आणि केवळ भारतीय नागरिकच मतदान करू शकेल, अशी व्यवस्था करणे हे या पुनरीक्षणाचे एक उद्दिष्ट आहे, अशी आयोगाची भूमिका. त्यासाठीच प्रत्येक मतदाराकडून नागरिकत्वाचा पुरावा मागितला जात आहे. मतदार यादीतल्या विदेशी नागरिकांना बाहेर काढले पाहिजे, असे आयोग दबक्या आवाजात आणि भाजप प्रवक्ते तावातावाने ओरडून सांगत आहेत. विदेशी स्थलांतरितांच्या प्रश्नाचे स्वरूप कोणत्या राज्यात सर्वात गंभीर आहे? - आसाम.

तिथे हा प्रश्न अर्धशतकाहून जुना आहे. ऐतिहासिक आसाम आंदोलन याच मुद्द्यावर झाले. याबाबतच्या आसाम कराराच्या अंमलबजावणीबाबतचे वाद गेली चाळीस वर्षे चालूच आहेत. आसामच्या मतदार यादीत संशयास्पद मतदारांची (डी व्होटर्स) नावे चिन्हांकित करण्यावरून गदारोळ उडाला होता. हा प्रश्न सोडवण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली राष्ट्रीय नागरिकता नोंदणीसाठी सर्वेक्षण झाले. नागरिकत्वाच्या पडताळणीसाठी इतका खटाटोप आणि इतका गोंधळ देशातील दुसऱ्या कुठल्याच राज्यात झालेला नाही.

देशभरातील मतदार यादीत नागरिकत्वाची पडताळणी खरोखर कुठे आवश्यक असेलच तर ती आसाममध्येच. सदर पुनरीक्षण सर्वप्रथम आसामातच व्हायला हवे होते. पण, 'पुनरीक्षणाची घोषणा करताना




आसाम का वगळले?'- या प्रश्नावर, देशाच्या उर्वरित भागापेक्षा आसाममधील नागरिकत्वाचे नियम वेगळे असल्यामुळे तिथला आदेश वेगळा येईल, असे उत्तर मुख्य निवडणूक आयुक्तांनी दिले होते. आसाममधील पुनरीक्षण उर्वरित देशापेक्षाही अधिक काटेकोरपणे केले जाईल, असाच अर्थ यातून निघत होता. संबंधित प्रक्रिया एनआरसीद्वारे पूर्ण झालेली असल्याने आसामात मतदार यादीचे अतिसखोल पुनरीक्षण होईल, असाच तर्क कुणीही केला असता. पण, आयोगाने आसामसंदर्भात लागू केलेला आदेश आश्चर्य वाटावे इतका उदार आहे. आसामात 'विशेष गहन पुनरीक्षणा'तील गहन हा शब्द आयोगाने गायब केलाय. आसामात केवळ विशेष पुनरीक्षण होणार.

देशभरात इतरत्र, मतदाराला गणना फॉर्म भरून द्यावा लागतो. आसामात कुणालाही कसलाही फॉर्म भरावा लागणार नाही. तिथे बीएलओ तुमच्या घरी येईल. नावांची खात्री करून घेईल, गरज पडल्यास त्यात बदल करेल. झाले पुनरीक्षण. देशाच्या इतर सर्व राज्यांत २००२ च्या मतदार यादीत असल्याचा पुरावा देऊ न शकणाऱ्या प्रत्येक मतदाराला दस्तऐवजासह स्वतःची नागरिकता स्वतःला सिद्ध करावी लागेल.

पण, आसामात असली कटकट मुळीच असणार नाही. अशी साधी, सोपी आणि पारदर्शक व्यवस्था देशातील सगळ्याच राज्यात लागू केली असती, तर सोन्याहून पिवळे नसते का झाले? सगळ्या देशाच्या घशात एक कडूजार औषध सक्तीने ओतले जात आहे. एका जीवघेण्या आजारापासून वाचण्यासाठी ते घेतलेच पाहिजे, असा डोसही वरून पाजला जात आहे. पण, ज्या रुग्णाला तो आजार झाल्याचा पुरावाच समोर आहे, त्याला मात्र कसलेच औषध न पाजता बिनधास्त मोकळे सोडले जात आहे. वस्तुतः, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आसामात प्रत्येक व्यक्तीची कागदपत्रे तपासण्यात आलेली आहेत. सहा वर्षे चाललेल्या या प्रक्रियेअंती, तेथील तब्बल १९ लाख लोक आपल्या नागरिकत्वाचे पुरावे देऊ शकत नसल्याचे दिसून आले. सहाजिकच ही नावे नागरिकत्वाच्या राष्ट्रीय नोंदणीत समाविष्ट करता आली नाहीत. मग तर निवडणूक आयोगाचे काम हलकेच झाले. या १९ लाखांना वगळले की झाली यादी तयार! पण थांबा. खरा खेळ समजून घ्यायचा, तर हे १९ लाख लोक कोण आहेत, हे पाहिले पाहिजे. त्यांची नावे वगळली, तर नुकसान कुणाचे होईल? यातील आकडेवारी औपचारिकपणे घोषित केलेली नाही. पण, बांगलादेशातून अवैध मार्गाने येथे आलेल्या या १९ लाखांतील बहुसंख्य लोक मुस्लीम नसून, हिंदू आहेत. नुकतेच आसामचे मुख्यमंत्री हेमंत सरमा यांनी या १९ लाखांत केवळ ७ लाखच मुसलमान असल्याचे पत्रकारांसमक्ष मान्य केले. इतर सगळे हिंदू आहेत. सुरुवातीला आसाममधील बंगाली हिंदू समुदायातच भाजपने आपला जम बसवला होता, हे तर सगळेच जाणतात. याचा अर्थ असा की, आसामात मतदार यादीचे सखोल पुनरीक्षण झाले असते आणि ही सगळी १९ लाख नावे वगळली गेली असती, तर नुकसान भाजपचेच अधिक झाले असते.- खरी खेळी आता आली ना लक्षात?, निवडणूक आयोग आणि भाजप यांच्यात साटेलोटे आहे की नाही?, की अजून काही शंका उरलीय मनात?

# पुरुषांनाही मन असतं...



**प्रतिक गंगणे (दै. आरंभ पर्व)**

समाजात एक वाक्य कायम ऐकू येतं-"पुरुष म्हणजे कणखर असतात. त्यांच्या भावना दाखवायच्या नसतात." आणि अनेकदा केवळ या एका अपेक्षेमुळे पुरूषांना त्यांच्या आयुष्यातल्या सर्वात महत्वाच्या गोष्टी-दुःख, वेदना, अपमान, ताण, भीती-मनातच गिळून टाकाव्या लागतात. या पिढीत "पुरुष" म्हणताच जो बाणा डोळ्यासमोर उभा केला जातो, त्यात भावना दाखवण्याला जागाच राहिली नाही.

स्त्री रडली, व्यथित झाली, कुणावर शाब्दिक किंवा भावनिक अवलंबून राहिली तर समाज तिला जवळ घेतो, तिच्या भावना मान्य करतो. पण हाच समाज पुरुष रडला तर त्याची थट्टा करतो-"अरे तू तर मर्द

- **पुरुषाला रडू दिलं तर... समाज बदलेल**

आहेस! एवढं काय?" पुरुषासाठी रडणे म्हणजे कमजोरी, नश्वरता आणि पराभवाची खूण आहे, असा चुकीचा समज आपण पिढ्यानपिढ्या पुढे सरकवत आलो आहोत.

पुरुषांना शिकवले जाते-रडायचं नाही, थकायचं नाही, हार मानायची नाही, कुणाकडे मदत मागायची नाही. आणि या शिकवणुकीची सर्वात मोठी किंमत पुरुषच चुकवतात. काहींचं आयुष्य काम, जबाबदाऱ्या आणि ताण यांच्या चक्रात अडकून जातं. काहींच्या नात्यांवर परिणाम होतो. तर काही जण मानसिक आरोग्याच्या समस्यांना सामोरं जातात. पण मदतीसाठी आवाज कोण काढणार?

> **प्रेम, दुःख, तुटलेली अपेक्षा, मनातलं ओझं-या मानवी भावना आहेत. स्त्रीसाठी जशा, तशाच पुरुषांसाठीही. संवेदनशीलता ही कधीही कमजोरी नसते. उलट एखादा पुरुष आपल्या भावना स्वीकारतो, त्यांचे शब्दात रूपांतर करतो, यातच स्त्रीत्व नाही-इथेही पुरुषाचा आत्मबळ असतं.**

आपण पुरुषाला रडू देत नाही, कारण आपण त्याच्याकडून नेहमी कठोरतेची अपेक्षा केली. पण प्रश्न आहे-मन तसंच कठोर असतं का? की समाजाने तसे बनवले? जर आपण मुलांना सांगितलं की "तुला पण मन आहे, तुला पण वेदना आहेत, रडायला हरकत नाही" -तर कदाचित पुढील पिढी एकमेकांना अधिक नीट समजून घेणारी, अधिक दयाळू आणि अधिक प्रगल्भ होईल.

पुरुष म्हणजे मशीन नाहीत. ते एकटीनेच जगाचा भार वाहतात म्हणून ते निर्भय असतात असं नाही. भावनाही त्यांच्यात असतात, ताणही, वेदनाही. समाजाने पुरुषांवर लादलेल्या अपेक्षांची साखळी मोडण्याची वेळ आली आहे.

पुरुषाने रडलं म्हणून त्याचा पुरुषार्थ कमी होणार नाही. पण रडण्यासाठी जागा न दिली, तर त्याच्या मनावरचा भार नक्कीच वाढेल.

# बालकावर बिबट्याचा हल्ला

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

निमगाव खंडोबा (ता. खेड) येथे एका साडेचार वर्षाच्या बालकावर बिबट्याने हल्ला करून त्याला जखमी केले आहे. या बालकाचे नाव देवांश योगेश गव्हाणे आहे. तालुक्याच्या पूर्व भागातील निमगाव येथील भगतवस्ती येथे मंगळवारी (दि. २५) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास देवांश घराबाहेर खेळत होता. यावेळी त्याच्यावर बिबट्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. आणि त्याच्या मानेला धरून शंभर फुट ओढत नेले. दरम्यान, देवांशची आई घराबाहेर आली आणि जोरजोराने ओरडायला लागली. तिच्या आवाजामुळे बिबट्या भेदरला आणि तो देवांशला सोडून पळून गेला. बालकाच्या मानेला बिबट्याचे दात लागून जखम झाली आहे. त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. खेड तालुक्याच्या पूर्व भागात गेल्या दोन महिन्यांपासून वाफगाव, गुळाणी, निमगाव, दावडी, रेटवडी या परिसरात बिबट्यांनी धुमाकूळ घातला असून अनेकांच्या घराजवळून कोंबड्या, कुत्रे, बकऱ्या बिबट्याने फस्त केल्या आहेत. या परिसरात दिवसाढवळ्याही सहज बिबट्याचे दर्शन होत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

# iQOO १५ लाँच : अँड्रॉइडचा नेक्स्ट-लेव्हल फ्लॅगशिप स्मार्टफोन

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड iQOO ने आज या वर्षासाठी त्यांचा प्रीमियम फ्लॅगशिप स्मार्टफोन, iQOO १५ लाँच केला. उत्कृष्ट हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर वैशिष्ट्यांसह सुसज्ज, iQOO १५ हा एक शक्तिशाली फोन आहे जो विशेषतः तरुण व्यावसायिकांसाठी डिझाइन केलेला आहे जे त्यांच्या स्मार्टफोनकडून अधिक अपेक्षा करतात - मग ते कामासाठी असो, सामाजिकीकरणासाठी असो किंवा मनोरंजनासाठी असो.

भारतातील फ्लॅगशिप स्मार्टफोनसाठी मानक वाढवत, iQOO १५ मध्ये उद्योगातील सर्वोत्तम Samsung 2K M14 LED OLED डिस्प्ले आहे.

जो Android स्मार्टफोनसाठी पहिला आहे. हा फोन भारतातील सर्वात तेजस्वी डिस्प्ले - २६०० निट्स (HBM) आणि ६००० निट्स स्थानिक पीक ब्राइटनेस प्रदान करतो, जो घराबाहेर असो किंवा बाहेर, क्रिस्टल-क्लिअर आणि ब्राइट स्क्रीन रिझोल्यूशन सुनिश्चित करतो. भारतातील सर्वात वेगवान स्नॅपड्रॅगन ८ एलिट जेन ५ प्रोसेसर आणि iQOO



च्या मालकीच्या सुपरकॉम्प्युटिंग चिप Q3 द्वारे समर्थित, ते अविश्वसनीय गती आणि कार्यक्षमता प्रदान करते. यात भारतातील सर्वात मोठी 8K सिंगल-लेयर VC कूलिंग सिस्टम देखील आहे, जी जास्त वापरात असतानाही फोन थंड ठेवते. iQOO 15 हा अँड्रॉइड 16-आधारित OriginOS 6 वर चालतो, जो एक गुळगुळीत आणि स्मार्ट सॉफ्टवेअर अनुभव देतो. कॅमेरा सेटअपमध्ये ट्रिपल 50MP कॅमेरा सिस्टम समाविष्ट आहे, ज्यामध्ये मोठा 50MP Sony IMX921 VCS मुख्य सेन्सर, 50MP अल्ट्रा-वाइड लेन्स आणि फ्लॅगशिप 50MP 3X टेलिफोटो पेरिस्कोप कॅमेरा आहे, जो प्रत्येक क्षणाचे तपशीलवार कॅप्चर करण्यास अनुमती देतो.

# परदेशी थाटात खुललेली लव्हस्टोरी!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मराठी प्रेक्षकांची उत्सुकता ताणून धरणारा अमोल शेटगे दिग्दर्शित, सचिन नाहर आणि अमोग मलाविया निर्मित 'आसा मी अशी मी'चा भव्य ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. लंडनच्या मोहक लोकेशन्समध्ये घडणारी ही प्रेमकहाणी ग्लॅमर आणि भावनिक वळणांनी सजलेली आहे. 'आसा मी अशी मी' चित्रपटाचा बहुप्रतीक्षित ट्रेलर अखेर प्रदर्शित झाला असून या ट्रेलर ने एका प्रेमकथेला आंतरराष्ट्रीय उंची दिली आहे. यूकेमधील भव्य लोकेशन्स, आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान, आलिशान प्रॉडक्शन व्हॅल्यू आणि मनाला भिडणारा रोमान्स. या सर्वांचा मिलाफ असलेला हा चित्रपट निर्माता सचिन नाहर आणि अमोग मलाविया यांच्या मोठ्या दृष्टीकोनाची झलक दाखवतो. या ट्रेलर मध्ये आपण पाहू शकतो अभिनेते



अजिंक्य रमेश देव एक भारतीय फोटोग्राफरच्या भूमिकेत आहेत.

देखणा, स्टायलिश आणि थोडासा कॅसानोव्हा स्वभावाचा. त्यांचं व्यक्तिमत्त्व एकदम मोकळं, धडाडीचं आणि जीवनाचा पुरेपूर आनंद घेणारं दाखवलं आहे. तर दुसरीकडे अभिनेत्री तेजश्री प्रधान एक परिपक्व, स्थिर आणि स्वतःच्या स्वप्नांनी भरलेली मुलगी म्हणून दिसते जी लंडनमध्ये स्वतःची ट्रॅव्हल एजन्सी चालवते. लंडनच्या चमचमणाऱ्या लोकेशन्समुळे त्यांच्या प्रेमाची प्रत्येक फ्रेम अधिकच उठून दिसते.

# विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणीय जबाबदारी वाढविण्यासाठी फ्लिपकार्ट फाउंडेशन आणि डब्ल्यूडब्ल्यूएफ-इंडियाकडून इको क्लबचे सक्षमीकरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

फ्लिपकार्ट ग्रुपची धर्मादाय शाखा असलेल्या फ्लिपकार्ट फाऊंडेशनने वर्ल्ड वाइड फंड फॉर नेचर - इंडिया (डब्ल्यूडब्ल्यूएफ-इंडिया) सोबत भागीदारी करून 'वसुंधरा मित्र - महाराष्ट्राच्या इको क्लबचे युवा संवर्धन प्रणेते' हा राज्यव्यापी पर्यावरण शिक्षण उपक्रम सुरू केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या वन विभागातील सामाजिक वनीकरण विभागाच्या पाठिंब्याने आयोजित या उपक्रमाचे उद्दिष्ट महाराष्ट्रातील तरुण, जबाबदार आणि कृतीशील पर्यावरणप्रेमी पिढीचे संगोपन करण्याचे आहे.

हा प्रकल्प १५ महिन्यांचा असून तो महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये राबवला जात आहे. त्यात इयत्ता ५



वी ते ९ वीपर्यंतचे १.५ लाख विद्यार्थी, ६,००० शिक्षक आणि मुख्याध्यापक (७२ मास्टर ट्रेनरसह) सहभागी करून घेतले जातील. या उपक्रमातून शाळा आणि आसपासच्या परिसरात पर्यावरण शिक्षण, शाश्वत पद्धती आणि युवा-नेतृत्वाखालील संवर्धन प्रयत्नांना चालना देणाऱ्या ३,००० ग्रीन स्कूल्स स्थापन केल्या जातील. त्याचा फायदा समाजातील सदस्य आणि कुटुंबांसह ९.३ लाखांहून अधिक व्यक्तींना होईल.

नागपूर येथे ७ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी, डब्ल्यूडब्ल्यूएफ-इंडियाचे प्रतिनिधी आणि फ्लिपकार्ट फाउंडेशनच्या उपस्थितीत या उपक्रमाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. पर्यावरण शिक्षण आणि युवा-नेतृत्वाखालील संवर्धनासाठी राज्यव्यापी चळवळ उभारण्याच्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. पुणे, ठाणे, नाशिक, संभाजीनगर, नागपूर आणि अमरावती येथे आयोजित प्रशिक्षकांच्या प्रशिक्षण (टीओटी) कार्यशाळांमध्ये राज्यातील ३६ जिल्ह्यांतील शिक्षकांना सहभागी करून घेण्यात आले आणि शाळांमधील इको क्लबना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांना परस्परसंवादी शिक्षण मॉड्यूल आणि सुविधा तंत्रांनी सुसज्ज करण्यात आले.

महाराष्ट्र वन विभागाचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण) श्री विवेक खांडेकर आयएफएस म्हणाले, "वसुंधरा मित्र कार्यक्रम हा शिक्षण आणि सामाजिक सहभागाद्वारे पर्यावरणीय व्यवस्थापन आणि शाश्वत विकासाचे संवर्धन करण्याच्या शासनाच्या दृष्टिकोनाचे प्रतीक आहे.

# एशियन पेंट्सची बीसीसीआयशी भागीदारी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देशभरात क्रिकेटचे आकर्षण सर्वोच्च स्तरावर असताना, भारतातील आघाडीचा रंग आणि डेकोर ब्रँड असलेल्या एशियन पेंट्सला भारतीय क्रिकेट नियामक मंडळा (बीसीसीआय) सोबत भारतीय क्रिकेटसाठी अधिकृत रंग भागीदार या नात्याने भागीदारीची घोषणा करताना अभिमान वाटतो. तीन वर्षांच्या या सहभागात भारतात खेळल्या जाणाऱ्या सर्व पुरुष, महिला आणि देशांतर्गत, 110 पेक्षा अधिक सामन्यांची व्याप्ती असणाऱ्या मालिका समाविष्ट असतील.

हा सहभाग एशियन पेंट्सचा क्रिकेटशी असलेला संबंध अधिक मजबूत करतो आणि क्रिकेटमधील प्रत्येक रंगाच्या 1.4 अब्ज हृदयांना एकत्र आणतो.

भारतीय घरांमध्ये रंग, सर्जनशीलता आणि भावना अनेक दशकांपासून साजरे करणारा ब्रँड




या नात्याने, एशियन पेंट्सने आता देशातील सर्वात मोठे आकर्षण - क्रिकेट क्षेत्रात आपली चैतन्यशील उपस्थिती विस्तारली आहे. हा मोठ्या प्रभावाचा सहभाग प्रेरणा आणि अभिव्यक्तीच्या पारस्पारिक भावनेवर आधारित आहे जो भारतातील चाहत्यांना एकत्र करत, रंग आणि क्रिकेटमध्ये नाते जोडतो. धाडसी निर्णय ते चैतन्यमय अभिव्यक्तींपर्यंत, एशियन पेंट्स आणि भारतीय क्रिकेट हे दोन्हीही खरे नेतृत्व कसे असते ते प्रदर्शित करतात. यामुळे अब्जावधी हृदयांना जोडणाऱ्या रंगांचा उत्सव साजरा करणारी एक सशक्त भागीदारी सजीव होते!

या भागीदारीबद्दल बोलताना, एशियन पेंट्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ श्री. अमित सिंगल म्हणाले, "क्रिकेट अब्जावधी हृदयांना एकत्र आणते आणि ती आसक्ती सजीव करणाऱ्या व्यासपीठावर बीसीसीआयसोबत भागीदारी करण्यास आम्हाला खूप आनंद होत आहे.

एशियन पेंट्समध्ये, आम्ही नेहमीच लोकांचे जीवन, अनुभव आणि अभिव्यक्ती यावर रंगाच्या सामर्थ्याच्या प्रभावावर विश्वास ठेवला आहे आणि हा सहभाग त्या विश्वासाला बळकटी देतो. बीसीसीआयसोबतच्या आमच्या भागीदारीद्वारे एका रोमांचक नवीन अध्यायाची सुरुवात झाली आहे - जिथे आम्ही भारतास सर्वात जास्त आवडणाऱ्या खेळाच्या गाभ्यात रंगाचे विश्व निर्माण करतो. अधिकृत रंग भागीदार या नात्याने, आम्ही चाहते आणि ग्राहकांशी अर्थपूर्ण मार्गांनी सहभाग साधण्यास, क्रिकेटचे चैतन्य आणि ऊर्जा साजरी करण्यास आणि खेळाच्या प्रत्येक क्षणात अधिक थरार आणि आनंद जोडण्यास उत्सुक आहोत. एशियन पेंट्समध्ये, घरे केवळ वास्तव्याच्या जागा नसून त्यात 1.4 अब्ज स्वप्ने एकच बनतात असा आमचा विश्वास आहे. या सामूहिक उत्कटतेमध्ये, आपल्याला रंगाचा खरा उद्देश = नातेसंबंध जोडणे, हा दिसतो. आमच्याकडे अनेक मनोरंजक एकीकरणे आहेत जी या क्रिकेटशी सर्वात "रंगीत" नातेसंबंध जुळवतील.

बीसीसीआयचे प्रवक्ता, श्री. देवजित सैकिया पुढे म्हणाले, "भारतीय क्रिकेटचा अधिकृत रंग भागीदार म्हणून एशियन पेंट्सचे स्वागत करताना आम्हाला आनंद होत आहे. लोकांच्या जीवनात रंग आणि भावना जोडण्याचा एशियन पेंट्सचा वारसा भारतीय क्रिकेटच्या भावनेला पूर्णत: पूरक आहे. एकत्रितपणे, आम्ही देशभरातील चाहत्यांसाठी संस्मरणीय अनुभव निर्माण करण्यास उत्सुक आहोत"

एशियन पेंट्सची भागीदारी आकर्षक ऑन-ग्राउंड आणि डिजिटल सक्रियकरणांच्या मालिकेद्वारे सजीव होईल, स्टेडियम अनुभवांपासून ते चाहत्यांच्या सहभाग मोहिमेपर्यंत - जे सर्व भारताच्या क्रिकेट उत्साहाचा उत्सव साजरा करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. पहिल्यांदाच तुम्हा प्रत्यकास "द एशियन पेंट्स कलर कॅम" नावाचा फॅन कॅम दिसेल जो "सर्वात रंगीबेरंगी चाहत्यां"ना साजरा करेल. या प्रथमच येणाऱ्या फॅन कॅममुळे खूप सहभाग निर्माण करेल आणि अशा रीतीने एका वेळेस एक छटा या प्रकारे "क्रिकेटमध्ये रंग" जोडला जाईल.

या व्यतिरिक्त, ब्रँडमध्ये "कलर काउंटडाउन" देखील असेल जो प्रेक्षकांना 'रंग आणि गृह सजावटीचे ट्रेंड' दाखवेल जे चाहत्यांच्या हृदयात आणि घरांमध्ये प्रवेश करतील. हा ब्रँड मीडिया, डीलर आणि ग्राहक संपर्क बिंदूंमधील संबंधांना एकरूप करेल, ज्यामुळे लाखो भारतीयांशी भावनिक बंध मजबूत करण्यासाठी क्रिकेट हे एक नवीन चैतन्यशील व्यासपीठ बनेल.

## थोडक्यात पण महत्वाचे



### एनआयआरडीसीने विकसित केले 'इनडअॅप'

- **एमएसएमई क्षेत्रासाठी हे भारताचे 'अलिबाबा' ठरण्याची शक्यता**

**पुणे (आरंभ पर्व) : उद्योजकांना संपूर्ण भारतात नेटवर्किंग सुलभ करण्यासाठी, व्यापारात मदत करण्यासाठी आणि सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी एक 'सिंगल-विंडो प्लॅटफॉर्म' म्हणून याची रचना केली गेली आहे राष्ट्रीय उद्योग संशोधन आणि विकास परिषदेने (एनआयआरडीसी) एमएसएमई (एमएसएमई) क्षेत्रातील सहभाग आणि पोहोच वाढवण्यासाठी 'इनडअॅप' (इनडअॅप) नावाच्या एका स्वदेशी डिजिटल प्लॅटफॉर्मच्या विकासाची घोषणा केली. हे राष्ट्रव्यापी बीटूबी बाजारपेठ भारतीय ब्रँड्सना आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मक बनवणे, भारतीय कारागीर आणि हस्तकलाकारांना जागतिक स्तरावर ओळख मिळवून देणे आणि एमएसएमईंना 'विकसित भारत'च्या दृष्टीकोनात योगदान देण्यास सक्षम करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आले आहे. आठ मंत्रालयांच्या पाठिंब्याने, हे विशेषतः संपूर्ण भारतातील एमएसएमई क्षेत्रातील उद्योजकांसाठी तयार केले गेले आहे.या प्लॅटफॉर्मचे फायदे खूप व्यापक आहेत. सरकारी योजनांची माहिती पुरवण्यापासून आणि भांडवलाचा लाभ घेण्यास मदत करण्यापासून ते व्यवसायाची दृश्यमानता वाढवणे आणि प्रशिक्षण व क्षमता बांधणीमध्ये मदत करण्यापर्यंत, 'इनडअॅप' एका क्लिकवर एमएसएमईसाठी डिजिटल सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा करते. त्याच्या बहु-उपयोगी मूल्यामुळे या अॅपला एमएसएमई क्षेत्रातील एक 'तंत्रज्ञानात्मक क्रांती' म्हणून पाहिले जात आहे. भारताच्या दुर्गम भागातून वस्तूंचा व्यापार करणाऱ्या भारतीय व्यवसायासाठी, 'इनडअॅप'चे बाजारपेठ हे असे ठिकाण आहे जिथे व्यापारी एका समर्पित श्रेणी अंतर्गत उत्पादने आणि सेवांची यादी करू शकतो आणि विविध ठिकाणांवरील इतर व्यवसायांचा शोध घेऊ शकतो.**

### पश्चिम विभागाची निवृत्तीसाठी सज्जतेत राष्ट्रीय सरासरीवर आघाडी



**पुणे (आरंभ पर्व) : ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्स लिमिटेड ने आपल्या प्रमुख निवृत्ती सर्वेक्षण असलेल्या इंडिया रिटायरमेंट इंडेक्स स्टडीच्या (आयरिस) पाचव्या आवृत्तीचे पश्चिम विभागातील निष्कर्ष जाहीर केले. त्यातून असे दिसून येते की भारताचा पश्चिम विभाग उर्वरित देशांपेक्षा निवृत्तीसाठी जास्त तयार आहे. येथील निवृत्ती निर्देशांक ५० असून राष्ट्रीय सरासरी ४८ पेक्षा दोन गुणांनी जास्त आहे. आयआरआयएस सर्वेक्षण जगातील आघाडीची मार्केटिंग डेटा आणि विश्लेषण कंपनी कंटार यांच्या भागीदारीत केले जाते. ते ० ते १०० च्या स्केलवर शहरी भारतातील निवृत्ती तयारीचे मूल्यांकन करते. आर्थिक तयारी, आरोग्य तयारी आणि भावनिक तयारी या तीन महत्त्वाच्या निर्देशांकांमध्ये हा स्कोअर निश्चित केला जातो. ॲक्सिस मॅक्स लाईफ इन्शुरन्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुमित मदन म्हणाले: पश्चिम भारतातील निष्कर्ष सकारात्मक गती दर्शवतात. निवृत्ती गुंतवणुकीचे प्रमाण २०२२ मध्ये ६२ टक्के होते ते २०२५ मध्ये ७२ टक्क्यांपर्यंत वाढले असून जे राष्ट्रीय ट्रेंडपेक्षाही पुढे आहे. हे जागरूकतेपासून निर्णायक कृतीकडे होणारा स्पष्ट बदल दर्शवते. निवृत्ती नियोजन वैयक्तिक निवडीऐवजी सामाजिकदृष्ट्या मान्यताप्राप्त आदर्श बनत आहे. शिफारशींवर आधारित ९१ टक्के नियोजन आणि वैयक्तिक आकांक्षा आणि कौटुंबिक गरजांशी जोडलेल्या प्रेरणांसह निर्णय विश्वासार्ह नेटवर्कद्वारे घेतले जातात. ही सामूहिक मानसिकता श्रेणीतील वाढीसाठी मोठी संधी निर्माण करते कारण विमा कंपन्या फक्त उत्पादनकेंद्री संवादावर अवलंबून राहण्याऐवजी अभिप्रायानुसार काम करतात.**

### विद्यार्थिनींच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष?

**सिंहगड (आरंभ पर्व) : विद्यार्थिनी, तरुणी आणि महिलांवरील वाढत्या विकृत प्रवृत्तीच्या घटनांनी महाराष्ट्रात चिंता वाढली असताना, प्रशासन मात्र अद्यापही जागे झालेले दिसत नाही, अशी तीव्र नाराजी नागरिक व पालकांकडून व्यक्त केली जात आहे. घोषणांचा ढोल वाजवणारे अधिकारी लोकप्रियतेपुरतेच बोलतात, पण प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र होत नसल्याची भावना वाढत आहे. काही दिवसांपूर्वी पुणे महापालिकेने "विद्यार्थिनींच्या बसमध्ये स्वसंरक्षण प्रशिक्षण घेतलेल्या महिला सुरक्षा रक्षकांची नेमणूक केली जाईल" अशी घोषणा केली होती. मात्र हा निर्णय आता पूर्णतः हवेत विरला असून, कोणतीही हालचाल होताना दिसत नाही. शिक्षण विभागाकडून पुणे मनपाकडे 68 शाळांमधील विद्यार्थ्यांच्या ने-आणीसाठी बस व्यवस्था आहे.**




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर २०२५









# खडकवासल्याचा "श्रावण बाळ"

## संदीप भाऊ मतेंना सहकार्य करा : आमदार सचिन अहिर यांचे आवाहन

### संदीप मते यांच्याकडून उज्जैन यात्रेतील हजारो महिला भगिनींचा मेळावा

याच कार्यक्रमात ज्येष्ठ नेत्या लक्ष्मीबाई मते आणि शारदाताई मते यांनी शिवसेनेत प्रवेश करून महत्त्वपूर्ण राजकीय संदेश दिला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन खडकवासला विधानसभा अध्यक्ष नितीनदादा वाघ यांनी केले.







**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला परिसरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या वतीने आयोजित उज्जैन महाकाल यात्रेतील 3000 महिला भगिनींना ओळखपत्र वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात पुणे शहर संपर्कप्रमुख आमदार सचिन अहिर यांनी खडकवासल्याच्या "श्रावण बाळ" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या युवा नेते संदीप मते पाटील यांचे कौतुक करत नागरिकांना त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले.

अहिर म्हणाले की, खडकवासला व प्रभागामध्ये संदीप मते यांनी केलेल्या लोकाभिमुख उपक्रमांमुळे त्यांच्या नेतृत्वाची स्पष्ट छाप पडली आहे. "अशा समाजकारण करणाऱ्या युवा नेतृत्वाला जनतेचा आणि पक्षाचा मोठा आशीर्वाद मिळायला हवा. आपल्या आशीर्वादाने खडकवासला प्रभागाला एक योग्य, परिश्रमी आणि जनतेसाठी झटणारा युवा नगरसेवक पाहायला मिळेल," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

माजी महापौर स्नेहलताई आंबेकर यांनी संदीप मते यांच्या संघर्षमय कार्याची महती सांगितली.. असा कष्टकरी शेतकरी कुटुंबातील नेता जनतेसाठी काहीतरी करतोय हे तुम्हा आमच्यासारखेचे भाग्य आहे. ते नगरसेवक निश्चितपणे होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात आयोजक संदीप मते यांनी बोलताना प्रभागातील माता-भगिनींसाठी महाकाल यात्रा आयोजित करण्याचा घेतलेला संकल्प सांगितला.

ते म्हणाले "महाकाल यात्रा हा माझा जनसेवेचा संकल्प आहे. आज पहिल्या टप्प्यात 3000 भगिनींना ओळखपत्र दिले असून, एकूण 10,000 महिलांना उज्जैन दर्शन घडविण्याचा माझा संकल्प आहे.ते पुढे म्हणाले.

"आजवर 80 टक्के समाजकारण आणि 20 टक्के राजकारण या तत्त्वावर काम केले. यापुढेही प्रभागातील जनतेसाठी कटिबद्ध राहणार आहे."

कार्यक्रमाला मोठ्या संख्येने मान्यवरांची उपस्थिती होती.

पुणे शहर संपर्कप्रमुख आमदार सचिन अहिर, महिला संपर्क प्रमुख व माजी महापौर स्नेहलताई आंबेकर, राज्य संघटक वसंत तात्या मोरे, शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, जिल्हाप्रमुख प्रकाश भेगडे, संजय काळे, माजी नगरसेवक काकासाहेब चव्हाण,माजी नगरसेवक बाळासाहेब धनवडे, ज्योती गाडे, अनिताताई इंगळे, भरत कुंभारकर, संतोष गोपाळ, अविनाश बलकवडे, रवी मुजुमले, बुवा खाटपे, पोपट चोरघे, डॉ. नंदकुमार मते,तृप्ती पोकळे, गोकुळ करंजावणे आदी मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे

### प्रभागांतील मतदार पळवापळवी थांबवा; अन्यथा उग्र आंदोलन



- मनसेचे विधानसभा अध्यक्ष विजय मते यांचा इशारा

पुणे (आरंभ पर्व) : नवीन प्रभाग रचनेनंतर मतदार यादीत पत्ता बदलून कृत्रिमरीत्या मतदारसंख्या वाढवण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा गंभीर आरोप मनसेचे खडकवासला विधानसभा अध्यक्ष विजय मते यांनी केला आहे. ते म्हणाले की, "ही प्रक्रिया तर ठरवून मॅच फिक्सिंग केल्यासारखी चालली आहे. एका प्रभागातील मतदारांना दुसऱ्या प्रभागात हलवले जात आहे. हा प्रकार लोकशाहीला घातक असून, निवडणूक आयोगाने तत्काळ याची दखल घेणे अत्यावश्यक आहे." सध्याच्या नियमांनुसार अशा मतदारांवर हरकत नोंदवण्यासाठी ओळखपत्र, आधारकार्ड आदी कागदपत्रांसह सात दिवसांची मर्यादा असल्याने ही प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट होत असल्याचे त्यांनी सांगितले. "राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना एवढ्या कमी वेळेत सर्वांची छाननी करणे शक्यच नाही. म्हणून ही जबाबदारी आयोगाने स्वतः घेतली पाहिजे," अशी मागणी त्यांनी केली. विजय मते पुढे म्हणाले, "पत्ता बदलून केलेली ही कृत्रिम वाढ थांबवून योग्य त्या मतदारांचीच नावे प्रभागात ठेवावीत. आयोगाने तात्काळ पडताळणी करून चुकीची नावे कमी करावीत. अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे आम्ही उग्र आंदोलन करण्यास भाग पाडले जाऊ." स्थानिक नागरिकांनीही या मागणीचे समर्थन करत, मतदार यादीची प्रक्रिया पारदर्शक आणि व्यवस्थित पार पडावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



### संविधान दिनानिमित्त नारायणराव सणस विद्यालयात कार्यक्रम

धायरी (आरंभ पर्व) : संविधान दिनानिमित्त आज (२६ नोव्हेंबर) नारायणराव सणस विद्यालयात दिवंगत नारायणराव सणस यांच्या पुण्यस्मरणाचा कार्यक्रम भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी या महान व्यक्तिमत्त्वाबद्दल आदर व्यक्त करत त्यांच्या योगदानाची आठवण केली. कार्यक्रमाची सुरुवात नारायणराव सणस यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून झाली. शिक्षकवर्गाने त्यांच्या सामाजिक कार्याची, शैक्षणिक दृष्टीची आणि समाज upliftment मध्ये केलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांनी संविधान दिनाचे महत्त्व, लोकशाहीतील नागरिकांची भूमिका आणि नारायणराव सणस यांनी जपलेल्या मूल्यांचा वारसा पुढे नेण्याची प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमात देशभक्तिपर गीत, निबंध सादरीकरण आणि प्रास्ताविक वाचनाने वातावरण भारावून गेले.

## 'संविधान : माझं आयकार्ड' - हाच आपला खरा चेहरा, खरी ओळख

### पत्रकार विशाल भालेराव



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय लोकशाहीचे सामर्थ्य समजून घेण्यासाठी संविधानाशी नाळ जोडणे आजच्या काळाची गरज आहे, असे मत व्यक्त करत 'संविधान : माझं आयकार्ड' ही आगळीवेगळी संकल्पना पत्रकार विशाल भालेराव यांनी मांडली आहे. समाजामध्ये संविधानाबाबतची जाणीव आणि अभ्यास वाढावा, यासाठी त्यांनी जनजागृती मोहीमही सुरू केली आहे.

"आपली खरी ओळख जात, धर्म, भाषा किंवा पक्षनिष्ठेत नाही... आपल्या हातातलं सर्वोच्च आयकार्ड म्हणजे भारतीय संविधान. हाच आपला चेहरा आणि हाच आपला परिचय," असे स्पष्ट करत भालेराव यांनी तरुणांना संविधानाचा अभ्यास करण्याचे आवाहन केले.

संविधानातील मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि नागरिकांच्या संरक्षणासाठीच्या तरतुदींबाबत माहिती सोप्या पद्धतीने लोकांपर्यंत पोहोचावी यासाठी ते विविध माध्यमांतून सतत जनजागृती करत आहेत. भालेराव यांनी नमूद केले की, संविधानाचा अभ्यास ही काळाची तातडीची गरज तरुणांनी उद्देशिकेचे दैनंदिन वाचन करण्याची सवय लावावी सामाजिक एकता, बंधुभाव आणि लोकशाही मुल्यांसाठी संविधानच सर्वोच्च मार्गदर्शक

नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत, "संविधानाशी नाळ जोडण्याचा हा अभिनव आणि सकारात्मक उपक्रम आहे," अशा प्रतिक्रिया दिल्या.




### एच.व्ही.देसाई आय हॉस्पिटल आणि संकरा आय फाऊंडेशनच्या सहयोगाने

# सोलापूरमध्ये पीबीएमएच्या शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटलचे उद्घाटन

**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटलच्या रूपाने सोलापूर मध्ये जागतिक दर्जाच्या व निरंतर नेत्र चिकित्सा सेवांचे नवे पर्व सुरू झाले असून याचे उदघाटन एका दिमाखदार सोहळ्यात पार पडले. पीबीएमए चे एच.व्ही.देसाई आय हॉस्पिटल,पुणे आणि संकरा आय फाऊंडेशन, युएसए च्या सहयोगाने शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटल हे अद्ययावत नेत्रचिकित्सा रुग्णालय सोलापूर मध्ये सुरु करण्यात आले आहे. यावेळी उद्घाटन समारंभाकरिता प्रमुख पाहुणे म्हणून संकरा आय फाऊंडेशन, युएसएच्या विश्वस्त मंडळाचे सदस्य वेंकट मद्दीपति,संकरा आय फाऊंडेशन, युएसए चे विश्वस्त दिव्योगी पटेल आणि सन्माननीय पाहुणे म्हणून कल्पतरू फाउंडेशन, यूएसए चे संचालक अमोल कुलकर्णी आणि प्रतिभा बाचल हे उपस्थित होते. यांसह पीबीएमएच्या एच.व्ही. देसाई आय हॉस्पिटलच्या विश्वस्त मंडळाचे सदस्य आणि एच.व्ही. देसाई आय हॉस्पिटलचे चेअरमन नितीन देसाई, अध्यक्ष राजेश शहा, उपाध्यक्ष सुधीर साबळे, सचिव राहुल राठी, खजिनदार मयुर व्होरा आणि चंद्रकिशोर व्होरा व धनराज पाटील,तसेच साबळे परिवारातील अरुण साबळे व संजय साबळे, एच.व्ही.देसाई आय हॉस्पिटलच्या संचालक मंडळाचे सदस्य व एच.व्ही देसाई आय हॉस्पिटलचे कार्यकारी संचालक परवेझ बिलीमोरिया, मुख्य वैद्यकीय संचालक डॉ.राहुल देशपांडे, वैद्यकीय संचालक डॉ.कुलदीप डोळे आणि शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटलचे सहयोगी संचालक सुधीर सुधाळ आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.



खेड,बार्शी रोड येथे दोन एकर प्लॉट मध्ये 54,000 चौरस फुट अशा प्रशस्त जागेत हे रुग्णालय विस्तारलेले आहे. या सुविधेचा उद्देश सोलापूर व आसपासच्या भागांसाठी आधुनिक व उच्च-गुणवत्तेच्या नेत्रचिकित्सा सेवा प्रदान करणे आहे.

**या रुग्णालयाची जागा ही सोलापूर येथील श्री. कुमार कराजगी यांनी दान केली असून प्रमुख दात्यांमध्ये श्री. सुधीर साबळे आणि त्यांच्या कुटुंबीयांचा समावेश आहे. या पुढाकाराला संकरा आय फाऊंडेशन, युएसएचे प्रमुख सहकार्य लाभले आहे.जागतिक दर्जाची सुविधा,अग्रगण्य नेत्रतज्ज्ञ आणि कुशल कर्मचाऱ्यांच्या टीमने हे रुग्णालय सुसज्ज आहे. सुरुवातीला, येथे व्यापक नेत्र तपासणी, निदान सेवा आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया या सेवा दिल्या जाणार आहेत. औपचारिक उद्घाटनानंतर रुग्णालयातील सेवा टप्प्याटप्प्याने विस्तारित केल्या जाणार आहेत.**

पीबीएमएच्या एच.व्ही.देसाई आय हॉस्पिटलचे चेअरमन नितीन देसाई म्हणाले की, सरासरी जीवनमान वाढत असताना मोतीबिंदू शस्त्रक्रियांसाठीच्या सेवांची गरज वाढणार आहे. जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा ही एक सुरुवात असून निरंतर सेवा या महत्त्वाच्या ठरतील. त्यादृष्टीने या नेत्र रुग्णालयाने पावले उचलली असून पहिल्या 45 दिवसातच 1100 शस्त्रक्रिया केल्या आहेत. त्यांनी संकरा आय फाऊंडेशन व सर्व दात्यांचे आभार मानले.

एच.व्ही.देसाई आय हॉस्पिटलचे विश्वस्त व उपाध्यक्ष सुधीर साबळे म्हणाले की, माझ्या वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ या निरंतर सेवांची सुरुवात ही समाधान देणारी बाब आहे. या सेवांच्या माध्यमातून एक सुंदर नेत्र सेवा मंदिर उभारले गेले आहे.

संकरा आय फाऊंडेशन, युएसए चे विश्वस्त दिव्योगी पटेल म्हणाले की, या उदघाटनामुळे आमच्या कार्याच्या क्षमतेमध्ये आणखी भर पडली आहे. भारतात आपल्याला आणखी अशा अनेक संस्थांची गरज आहे

संकरा आय फाऊंडेशन, युएसएच्या विश्वस्त मंडळाचे सदस्य वेंकट मद्दीपति म्हणाले की, यूएसए मधील 800 समर्पित स्वयंसेवकांच्या माध्यमातून संकरा आय फाऊंडेशनचे कार्य सुरू आहे. आमचे ध्येय हे भारतात दरवर्षी 10 लाख मोफत नेत्र शस्त्रक्रिया करणे व टाळण्याजोगे अंधत्व दूर करणे हे आहे.

सुरुवातीला एच.व्ही देसाई आय हॉस्पिटलचे कार्यकारी संचालक परवेझ बिलीमोरिया यांनी पीबीएमएच्या आजवरच्या प्रवासाबाबत सादरीकरण केले .

वैद्यकीय संचालक डॉ.कुलदीप डोळे यांनी सूत्रसंचालन केले , तर शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटलच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.रेश्मा मेहता यांनी आभार प्रदर्शन केले .

एच.व्ही. देसाई आय हॉस्पिटल हे भारतातील आघाडीच्या टर्शरी आय केअर हॉस्पिटल्स पैकी एक आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ‘पहिलं स्वतःच्या संस्कृतीचा विचार करा, नंतर आमच्याबद्दल बोला’


भोर (आरंभ पर्व) : “राजकारणात टीका करा, प्रश्न विचारा, पण आधी स्वतःच्या संस्कृतीचा विचार करा... नंतर आमच्याबद्दल बोला,” अशा शब्दांत माजी आमदार संग्राम थोपटे यांनी विरोधकांना जोरदार टोला लगावला. भोर तालुक्यात आयोजित सभेत ते बोलत होते. थोपटे म्हणाले की, “जनतेसाठी काम करताना आम्हाला कुणाची प्रमाणपत्रे लागत नाहीत. विकासकामांमध्ये अडथळे आणून काही लोक केवळ सोशल मीडियावर संस्कृतीचे गोरगरिबांना खोटे धडे देतात. त्यांना प्रथम आरशात स्वतःकडे पाहण्याची गरज आहे.” सभेत मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी स्थानिक प्रश्नांवरून थोपटे यांनी विरोधकांच्या टीकेला प्रत्युत्तर देत राजकीय वातावरण तापवले.

### शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीत नागरिकांची तत्पर मदत

वारजे (आरंभ पर्व) : वारजेच्या रामनगर परिसरात विजेच्या शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची घटना घडली. अचानक उठलेल्या धुराची दखल घेत स्थानिक नागरिकांनी त्वरित फोन करून प्रशासनाला माहिती दिली. नागरिकांच्या जागरूकतेमुळे मदतकार्य क्षणात सुरू झाले. माहिती मिळताच संबंधित पथक घटनास्थळी दाखल झाले. फायर ब्रिगेड आणि पोलीस प्रशासनाने नागरिकांच्या मदतीने आग विझवण्याचे काम जलद गतीने पूर्ण केले. संयुक्त प्रयत्नांमुळे आग मोठ्या प्रमाणावर पसरू न देता नियंत्रित करण्यात यश आले. सुदैवाने, या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही, ही दिलासादायक माहिती स्थानिकांनी दिली.

### एकता युवक संघाच्या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग

सिंहगड (आरंभ पर्व) : एकता युवक संघाच्या वतीने आयोजित कार्यक्रमाला गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन एकता युवक संघाचे माजी अध्यक्ष उत्तम शेलार यांनी केले. या प्रसंगी संघाचे अध्यक्ष संघदिप शेलार, ग्रामपंचायत सदस्य रुपाली जगताप, तसेच श्रीकांत शेलार, कविता शेलार, शारदा शेलार, दत्तात्रय शेलार, दत्ता साळुंखे, छाया शेलार, रेखा शेलार, विमल जगताप, अनिता शेलार, रुपाली शेलार, अलका जगताप, रणजित जगताप, रजनीकांत शेलार, सचिन जगताप, अजित जगताप, सनी ओव्हाळ, मुकेश शेलार, सतिश जगताप, निलेश शहा, राज शेलार, रितेश जगताप, सुमेध शेलार, तनिष जगताप व सार्थक जगताप यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात स्थानिक विषय, युवकांचे प्रश्न आणि संघटनेच्या आगामी उपक्रमांवर चर्चा झाली. उपस्थित मान्यवरांनी युवकांच्या एकजुटीचे आणि सामाजिक कार्यातील सहभागाचे कौतुक केले.







# सर्वांगीण शिक्षण मोबाईलचे खरे ‘अँटी-व्हायरस’

## प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे प्रतिपादन; सूर्यदत्त संस्थेला ‘महात्मा जोतीबा फुले राष्ट्रीय आदर्श शिक्षण संस्था’ प्रदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"सर्वांगीण शिक्षण, संस्कारक्षम उपक्रम हेच खरे मोबाईलचे 'अँटी-व्हायरस' आहेत. मोबाईलचा गरजेपुरता वापर करीत विद्यार्थ्यांनी आपली कौशल्ये, बुद्धी आणि कलागुणांचा विकास करण्यावर भर द्यावा. महात्मा ज्योतिबा फुले यांनी दिलेल्या प्रबोधनपर विचारांचा अंगीकार करून त्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला पाहिजे," असे प्रतिपादन सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी केले. 'सूर्यदत्त' संस्थेने सुरुवातीपासून महात्मा फुले यांच्या प्रबोधनाच्या मार्गावर चालत निस्वार्थपणे विद्यार्थ्यांना शिक्षित करतानाच समाजकल्याणाच्या



भावनेने कार्य करणारे सक्षम नागरिक घडवण्याचा प्राधान्य दिले असल्याचेही त्यांनी नमूद केले. वानवडी येथील महात्मा फुले सांस्कृतिक सभागृहात आयोजित १२९ व्या अखिल भारतीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या हस्ते झाले. त्यावेळी प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया बोलत होते. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या संमेलनात राज्यभरातील नामांकित साहित्यिक, कवी, संशोधक, कलाकार व साहित्यप्रेमी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. यावेळी सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सला ‘महात्मा जोतीबा फुले राष्ट्रीय आदर्श शिक्षण संस्था’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्रातील सारस्वत साहित्यिकांच्या साक्षीने आणि अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने हा मानाचा सन्मान प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी स्वीकारला. सामाजिक बांधिलकीची परंपरा, शिक्षणातील नाविन्यपूर्ण उपक्रम, मूल्यआधारित शिक्षणपद्धती आणि राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाने मार्गक्रमण करणाऱ्या सूर्यदत्तच्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला. 'उद्धरेदात्मनाऽत्मानम्...' या जीवनमंत्राच्या प्रेरणेने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सूर्यदत्त संस्था कार्यरत असल्याचे सांगत मान्यवरांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, “मराठी साहित्य हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आत्म्याचे संवाहक आहे. या परंपरेचे जतन, संवर्धन आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. महात्मा जोतीबा फुले यांच्या प्रबोधनपर विचारांची उजळणी करणाऱ्या या प्रतिष्ठित संमेलनाचा भाग होणे माझ्यासाठी सन्मानाची बाब आहे. सूर्यदत्त संस्थेतही विद्यार्थी संमेलने घेतली जातात. त्यातून आम्हाला विद्यार्थ्यांच्या नव्या प्रवृत्ती, दिशा आणि क्षमता ओळखता येतात आणि पुढील पिढीला योग्य मार्गदर्शन करता येते. आतापर्यंत १,२७,००० हून अधिक विद्यार्थी सूर्यदत्तमधून शिक्षण घेऊन बाहेर पडले आहेत. त्यापैकी ६,००० हून अधिक विद्यार्थी परदेशात प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये उच्च पदांवर कार्यरत आहेत."

या संमेलनाचे विशेष अतिथी म्हणून प्रसिद्ध कलावंत किशोर टिळेकर उपस्थित होते. डॉ. शरद गोरे यांनी महात्मा फुले यांच्या प्रबोधनपर, प्रखड आणि विचारांची प्रभावी मांडणी केली. तसेच नंदकिशोर राऊत यांनी आपल्या पत्नीचे लग्नानंतर शिक्षण पूर्ण करून त्यांना उच्चशिक्षित बनविले. आज त्या सरकारी उच्चपदावर कार्यरत असल्याचे प्रेरणादायी उदाहरणही मांडण्यात आले. संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचा सक्रिय सहभाग लाभला. कार्यक्रमाचे समन्वयन 'सूर्यदत्त'च्या संचालिका (पीआर) स्वप्नाली कोगजे यांनी केले.

## रिंगरोडसाठी वापरल्या जाणाऱ्या ढपरी गाड्यांची दुरवस्था

**सिंहगड (दै. आरंभ पर्व)**

प्रस्तावित रिंगरोड प्रकल्पासाठी माती-वाळू वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या ढपरी गाड्यांची (डंपर) अत्यंत खराब अवस्थेत वाहतूक सुरू असून त्यामुळे परिसरातील रस्ते, वाहतूक सुरक्षेला आणि नागरिकांच्या आरोग्यालाही गंभीर धोका निर्माण झाला आहे.

परिसरातील नागरिकांचे म्हणणे आहे की, “अर्धवट तांत्रिक तपासणी, धुरांचे ढग, फाटलेले टायर, तुटके बॉडी फिटींग... अशा डंपर गाड्या दिवसरात्र धावत आहेत. यामुळे रोजच अपघाताचे प्रसंग ओढवतात.” काही ढपरी गाड्यांमधून माती खुलेआम रस्त्यावर सांडत असल्याने धूळ वाढून स्थानिकांना श्वसनाचा त्रास होत



● **नागरिकांमध्ये संताप**

आहे. तसेच अनेक गाड्या ओव्हरलोड चालवल्याचा आरोप नागरिकांनी केला. रस्त्यांवरील खड्डे वाढण्याचे एक प्रमुख कारणही हेच डंपर असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. वाहतूक विभाग आणि प्रशासनाकडून तपासणीची कारवाई होत नसल्याने नागरिकांचा संताप वाढला आहे.

## संविधान रक्षणाची शपथ घेत संविधान दिन उत्साहात साजरा

**मालखेड-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

मालखेड - काळभैरवनाथ माध्यमिक विद्यालय, मालखेड येथे संविधान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूलभूत मूल्यांची जाण विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून विद्या कॉम्प्युटर चे संचालक शंकर बावणे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, “भारतीय संविधानाचा मुख्य हेतू लोकशाही, धर्मनिरपेक्ष आणि न्याययुक्त राष्ट्राची निर्मिती हा असून देशाच्या प्रशासनाची चौकटही यात स्पष्ट करण्यात आली आहे.” यावेळी शंकर भगत सर यांनी



संविधानाचे महत्त्व, नागरिक म्हणून कर्तव्ये आणि लोकशाही मुल्यांचे संवर्धन याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात आचल जोरी, उत्तम कांबळे, सोहम जोरी, प्रणाली खाटपे, आर्यन जोरी, अथर्व कापसे या विद्यार्थ्यांनी संविधानावरील प्रभावी भाषणे सादर केली.

शंकर भगत, विलास जोरी, अजित वळवी, दिप्ती राऊत, कोमल भालेराव, कृष्णप्रिया गोलांडे, सचिन जोरी, रजनी भालेराव यांची या कार्यक्रमाला उपस्थिती होती. विद्यालयाचे मुख्याध्यापक बारवकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आल्याचे शिक्षक विलास जोरी यांनी सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात संविधान निर्मात्यांना अभिवादनाने झाली. विद्यार्थ्यांनी संविधानाची प्रस्तावना सामूहिकरीत्या वाचून संविधान मूल्यांप्रती आपली निष्ठा व्यक्त केली. सविधान वाचनही करण्यात आले.

काळ भैरवनाथ माध्यमिक विद्यालयात साजरा करण्यात आलेला हा संविधान दिन उत्सव विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्यांची जाण, कर्तव्याची जाणीव आणि लोकशाहीची भावना अधिक दृढ करणारा ठरला. शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

# वेल्हे एस.टी. स्टँडची दुर्दशा

## परिवहन विभागाचे दुर्लक्ष : लोकांच्या संतप्त भावना

दैनिक आरंभपर्व — होय आमचं लक्ष आहे!

**वेल्हे-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

तब्बल १ कोटी ९० लाखांचा खर्च करून उभारण्यात आलेल्या वेल्हे एस.टी. स्टँडची आजची अवस्था अत्यंत दयनीय असून, हा स्टँड प्रवाशांच्या सोयीपेक्षा मध्यपींचा अड्डा आणि भटक्या कुत्र्यांचे आश्रयस्थान बनल्याची तिखट नाराजी स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. परिवहन मंडळाचे अधिकारी येथे हजेरी लावत नाहीतच, परंतु सर्वात गंभीर म्हणजे एस.टी. बसच येत नाहीत, असा संताप नागरिकांत आहे.



भोर विधानसभेतील नागरिकांनी अपेक्षेने नवीन आमदार निवडून दिले. मात्र, मतदारसंघ डोंगरदऱ्यांचा असल्याने कामे होत नाहीत, ही कारणे देण्याची सवय आमदारांच्या तोंडी कायम असल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे.

स्थानिक जनसेवक रामचंद्र भगवान जानकर (पुणे जिल्हा अध्यक्ष – जनता राज अभियान व भाजपा पुणे जिल्हा सचिव तसेच महाराष्ट्र शासनाचे विशेष कार्यकारी अधिकारी व माहिती अधिकारी) यांनीही या स्थितीवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

त्यांच्या म्हणण्यानुसार : लोक तालुक्यात राहिले नाहीत, त्यात आमदार साहेबांची चूक नाही.

लोक बाहेर पडले कारण रोजगार उपलब्ध करून देण्यात अपयश आले.रोजगारासाठी कोणताही प्रयत्न झाला नाही आणि करणारही नसल्याचे वास्तव दिसते.

उलट धूमधडाक्यात वर्षपूर्ती करण्यावर भर, तर मूलभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था आणि रोजगार याकडे पूर्ण दुर्लक्ष.

जानकर यांनी स्पष्ट शब्दांत सोशल मिडीयावरही सांगितले की, “स्टँड बांधून प्रवाशांना सोय व्हावी म्हणून पैसा खर्च झाला, पण आज स्टँडमध्ये प्रवासी नाही, अधिकारी नाहीत, बस नाही फक्त मध्यपीं आणि भटकी कुत्री आहेत. ही जनता फसवण्याची पद्धत बंद झाली पाहिजे.”

ते पुढे म्हणाले, “आमदार साहेबांनी तात्काळ लक्ष घालून एस.टी. सेवा नियमित करावी, रोजगारनिर्मितीवर ठोस पाऊले उचलावीत आणि लोकांचा विश्वास पुन्हा मिळवावा-हीच अपेक्षा.”

स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही लवकरात लवकर एस.टी. सेवा सुरू करणे, स्टँडची स्वच्छता व सुरक्षा परिवहन अधिकाऱ्यांची नियमित हजेरी याबाबत कठोर भूमिका घेतली आहे. तालुक्यातील प्रशासन आणि जनप्रतिनिधींनी त्वरित कारवाई करून वेल्हे स्टँडचा दर्जा उंचवावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

## पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याला केंद्राची मंजुरी

### खराडी–खडकवासला आणि नळस्टॉप–माणिकबाग मार्गाला वेग

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

पुणेकरांसाठी महत्त्वाची आनंदवार्ता! पुणे मेट्रोच्या बहुप्रतिक्षित दुसऱ्या टप्प्याला केंद्र सरकारची मंजुरी मिळाली असून, शहराच्या पूर्व–पश्चिम वाहतुकीला आता नवे बळ मिळणार आहे.



**मंजूर झालेले मार्ग**
**खराडी – खडकवासला**
**नळस्टॉप – माणिकबाग**

या मार्गांमुळे आयटी पार्क, शैक्षणिक संस्था, दाट वस्ती तसेच शहरातील प्रमुख दळणवळण मार्गांना सोयीस्कर आणि जलद कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. वाहतूक कोंडीतील मोठी घट आणि पर्यावरणपूरक प्रवासाला चालना मिळेल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

मेट्रोच्या मंजुरीनंतर नागरिकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. “आमचा रोजचा प्रवास आता अर्धा होणार,” अशी प्रतिक्रिया खराडीतील आयटी कर्मचाऱ्यांकडून मिळाली.

खडकवासल्यातील काही रहिवासी म्हणाले, “आम्हाला अखेर थेट मेट्रोची जोड मिळणार... हा निर्णय आमच्या परिसरासाठी ऐतिहासिक आहे.” तर बावधन व कोथरूड परिसरातील तरुणांनीही सोशल मीडियावर आनंद व्यक्त करत लिहिले,

“नळस्टॉप ते माणिकबाग मार्ग सुरू झाला तर वाहतुकीची डोकेदुखी संपेल.” व्यापाऱ्यांनीही मंजुरीचे स्वागत करत, “मेट्रोमुळे ग्राहकांची ये-जा वाढेल आणि व्यवसायालाही चालना मिळेल,” अशी आशावादी भूमिका मांडली. पुणेकरांनी केलेल्या या उत्साही स्वागतामुळे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्याची कामे वेगाने सुरू होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ‘वॉक फॉर संविधान’ने पुणे दणाणले; तीन हजार नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**पुणे-विशाल भालेराव (दै. आरंभ पर्व)**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान दिनानिमित्त बुधवारी भव्य ‘वॉक फॉर संविधान’ रॅली काढण्यात आली. भिडेवाडा (मुलींची पहिली शाळा) येथे संविधान उद्देशिकेस पुष्पहार अर्पण करून मा. चंद्रकांत पुलकुंडवार, विभागीय आयुक्त यांच्या हस्ते सकाळी ८.३० वाजता रॅलीचे उद्घाटन झाले.



या प्रसंगी बार्टीचे महासंचालक डॉ. सुनील वारे, सहआयुक्त प्रमोद जाधव, यशदाचे उपमहासंचालक डॉ. मद्रिनाथ कलशेट्टी, अप्पर जिल्हाधिकारी मारुती बोरकर, उपजिल्हाधिकारी अनिल कारंडे, उपायुक्त वृषाली शिंदे, उपायुक्त रविंद्र कदम, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विशाल लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते.

भिडेवाडा – बुधवार पेठ – लाल महाल – फडके हौद – दारूवाला पूल – १५ ऑगस्ट चौक – जुनी जिल्हा परिषद या मार्गावरून रॅली पुढे सरसावली. ढोल–ताशांच्या गजरात व लेझीम पथकाच्या निनादात विद्यार्थ्यांनी संविधान जागृतीचे फलक हातात घेत घोषणांनी परिसर दणाणला. बार्टीकडून आकर्षक चित्ररथ देखील सादर करण्यात आला.

येरवडा शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेशभूषेतून समानता, बंधुता व एकात्मतेचा संदेश दिला.

### तीन हजार नागरिकांचा सहभाग

**शहरातील विविध शाळा–महाविद्यालये, एनसीसी, वसतिगृहे, अधिकारी–कर्मचारी तसेच सामान्य नागरिक अशा सुमारे ३,००० सहभागींनी रॅलीत उत्साहात सहभाग नोंदविला. शिव–फुले–शाहू–आंबेडकर विचारांचे वारसदार व यूपीएससी तयारी करणाऱ्या ‘साऊ फाउंडेशन’च्या ४० विद्यार्थ्यांनी रॅलीचे समन्वयन केले. रॅलींचा समारोप सतीश गायकवाड यांच्या आभार प्रदर्शनाने झाला.**

रॅलीचा समारोप ससून रुग्णालयाजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात झाला.

मान्यवरांनी आंबेडकर प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. संविधान दिनानिमित्त डॉ. सुनील वारे यांनी मार्गदर्शन केले तर सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन केले. महार रेजिमेंटच्या माजी सैनिकांसह उपस्थितांनी संविधानास मानवंदना दिली.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.